प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



विश्वकर्मा विद्यापीठातील प्रदवीप्रदान कार्यक्रमातील एक क्षण.

# 'विश्वकर्मा'चा पदवीप्रदान सोहळा संपन्न

- **विविध विद्या शाखांमधील ८५० विद्यार्थ्यांचा गौरव**

**पुणे :** विश्वकर्मा विद्यापीठातील २०२४ मधील गुणवंतांना पदवी प्रदान करण्यात आली. पीएचडी, आर्किटेक्चर, आर्ट आणि डिझाइन, वाणिज्य आणि व्यवस्थापन अशा विविध शाखांमधील ८५० विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा पार केल्याचा आनंद या वेळी विद्यार्थ्यांनी साजरा केला.

फोर्स मोटर्सचे चेअरमन डॉ. अभय फिरोदिया, विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भारत अगरवाल यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. आर्किटेक्चरमधील ४४, आर्ट आणि डिझाइन ८४, वाणिज्य आणि व्यवस्थापन १६७, मानव्य आणि समाजशास्त्र १४२, विधी ११४, मीडिया आणि कम्युनिकेशन १५, फार्मसी ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान १८८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. फिरोदिया यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशावर आधारित कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'आपली संस्कृती टिकून राहणार आहे, यावर ठाम विश्वास ठेवा,' असे आवाहनही त्यांनी केले. तसेच, आशावादी जीवन जगण्यासाठी आणि समाजात अर्थपूर्ण योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी नव्या पिढीला केले.

विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भारत अगरवाल यांनी पदवीधरांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. भविष्यातील यशस्वी प्रवासात एकमेकांशी तसेच विद्यापीठाशी संपर्कात राहण्याचे आवाहन केले. आपल्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांसाठी विविध संधी उपलब्ध आहेत. नवीन विद्यार्थ्यांशी तुमचे अनुभव शेअर करण्यासाठी आम्ही तुम्हाला विद्यापीठात नक्की आमंत्रित करू, असेही अगरवाल म्हणाले.

विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे पुढच्या पिढीतील नेत्यांची जडण-घडण झाली आहे.

पदवीधर विद्यार्थी त्यांच्या जीवनातील नवीन प्रवासासाठी सज्ज होत असताना ते समाजात उत्तम कार्य करणार आणि दीर्घकालीन योगदान देतील, असा विश्वास विश्वकर्मा विद्यापीठ प्रशासनाने व्यक्त केला.

My Pune Edition
Oct 26, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com